तरुण भारत
www.tarunbharat.net

गुरुवार, २१ जुलै २०१६ १३

# तिरपुडे महाविद्यालयात लोकसंख्या दिन

तभा वृत्तसेवा
नागपूर, २० जुलै

तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनाचा कार्यक्रम नुकताच पार पडला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्रा. मीनाक्षी गणवीर तर प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. कल्पना देशमुख उपस्थित होत्या.



वाढत्या लोकसंख्येमुळे जलस्रोत प्रदूषित झाले आहेत. तसेच वाहनांची संख्या वाढली असून पर्यावरण, गरिबी, बेरोजगारी इत्यादी समस्यांमध्ये वाढ झाल्याचे यावेळी डॉ. देशमुख यांनी सांगितले. प्रा. गणवीर यांनी लोकसंख्येच्या समस्येबाबत विद्यार्थ्यांनी सामाजिक जनजागृती करावी असे आवाहन केले. संचालन विशाल रेमंड यांनी केले. आभार नवकेश टेकाडे यांनी मानले. ■